# श्री समर्थ रामदासस्वामींच्या गोष्टी



BVBK-0402818

सरस्वती ग्रंथ भांडार, पुणे

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | सूर्याजीचा नारायण | ३ |
| २. | मी आहे रामदास! | ५ |
| ३. | तीर्थयात्रेतील अनुभव | ८ |
| ४. | माऊलीची भेट | १० |
| ५. | तिसरे ते सावधपण | १४ |
| ६. | समर्थशिष्य कल्याण | १६ |
| ७. | एकसष्ट होनांची गोष्ट | १९ |
| ८. | भगवे निशाण फडफडले. | २३ |
| ९. | देह गेला कीर्ती उरली. | २७ |
| १०. | समर्थांच्या आठवणी | ३० |


*सदा सर्वदा योग तुझा घडावा ।*
*तुझे कारणी देह माझा पडावा ॥*
*उपेक्षू नको गूणवंता अनंता ।*
*रघुनायका मागणे हेचि आता ॥*


प्रकाशक : रमेश य. कुंदूर
मे. शारदा साहित्य, २८ ए, बुधवार पेठ, पुणे -२.

मुद्रक : मे. श्रीराम ऑफसेट
सर्व्हे नं. १४/२३, 'गायत्री', धायरी, पुणे.



लेखक : रं. म. जोशी (निर्मळ गुरुजी)
जानकीधाम, सुखदा सोसायटी, संजयनगरभाग,
डी चारी जवळ, श्रीरामपूर - ४१३७०९.



Naikons



© सर्व हक्क प्रकाशकांकडे.


प्रथमावृत्ती : मकरसंक्रांत, १९९०

# १ : सूर्याजींचा नारायण :

पैठणच्या परिसरात जांब नावाचे एक गाव आहे. तेथे शके १५३० (इ.स. १६०८) च्या चैत्र शुक्ल नवमीच्या ऐन दुपारी रामजन्माचा उत्सव चालू होता. कथेकरीबुवा सांगत होते, "दशरथाची राणी कौसल्या. तिने पुत्ररत्नाला जन्म दिला, तोच विष्णूचा सातवा अवतार ! राम जन्मलाऽ होऽऽ राम जन्मलाऽऽ! बोला – प्रभू रामचंद्र कीऽ जयऽ!"

लोकांनी गुलाल उधळला. मंडपात मध्यभागी बांधलेला पाळणा सुवासिनींनी हलविला. गाणी गाइली! सूर्याजीपंत ठोसर त्या गावचे कुलकर्णी.उत्सवाचे मुख्य कारभारी. ते लोकांना प्रसाद वाटू लागले. तेही आनंदाने गुणगुणत होते "...राम जन्मलाऽ होऽऽ राम..."

तेवढ्यात एक माणूस घाईघाईने येऊन तो सूर्याजींना म्हणाला, "अहो, तिकडं तुमच्या घरी राणूबाईला मुलगा झाला आहे, मुलगा!" मग सूर्याजीपंत तेथून उठले. घरी गेले. आयाबाया तेथे जमल्या होत्या. त्या म्हणाल्या, "बाळ-बाळंतीण सुखरूप आहेत! पंत, आज तुमच्या घरीसुद्धा राम जन्मला आहे!"

"नाही! हा राम नाही. आमच्या सूर्यवंशात हा नारायण जन्मला आहे! हा रामाचा दास होणार आहे!"

मग बारशाला त्या बाळाचे नाव 'नारायण' हेच ठेवले. बाळ नारायण अतिशय सुंदर, गोंडस व तेजस्वी होता. त्याचा थोरला भाऊ गंगाधर आपल्या धाकट्या बंधूला नारायणाला हर्र कुर्र करायचा!

नारायण हळूहळू मोठा झाला. सोबत्यांशी खेळू लागला. रानावनांत हिंडू लागला. नदीत डुंबू लागला. सूर्याजीपंत आपल्या त्या दोन्ही मुलांना रोज संध्याकाळी रामदर्शनाला नेत असत. रामायण-महाभारत शिकवीत असत. संध्या, देवपूजा व वेदमंत्र सांगत असत.

मुलांच्या मौंजी झाल्या. थोडेफार शिक्षण झाले. सूर्याजीपंत वारले. गंगाधराचे लग्न झाले. नारायण मात्र सदासर्वदा घराबाहेरच असायचा. सोबत्यांबरोबर हिंडणे, चिंचा, बोरे, कैऱ्या पाडून खाणे हेच त्याचे उद्योग चालायचे.

रामायण कथा ऐकून नारायणाला वाटायचे, मी मारुती — रामाचा दास आहे! मग काय, तो मारुतीसारखा उड्या मारी. झाडांच्या फांद्या मोडी. "जय श्रीराम" अशा आरोळ्या देई. "या पृथ्वीवर राक्षस पुन्हा अवतरले आहेत, त्यांचा नाश केला पाहिजे," असे म्हणत दात-ओठ खाऊन मित्रांच्या अंगावर धावे. हाच त्याला रात्रंदिवस ध्यास लागला.

एकदा राणूबाई म्हणाल्या, "बाळा नारायणा, अरे तू असा काय वागतोस? तुझं घरात लक्षच नाही. मारुतीच्या देवळात जाऊन बसतोस! तू सारखं कसलं चिंतन करतोस?"

"आई, मी चिंता करतो विश्वाची! मारुतीनं, रामरायानं, श्रीकृष्णानं जसा दुष्टांचा नाश केला आणि स्वतःचं राज्य स्थापून लोकांना जसं सुखी केलंऽ — तसं आपण आता केलं पाहिजे! वेळच आली आहे पुनः तशी."

त्याच्या त्या उत्तराने राणूबाईला नवल वाटले. आनंदही झाला. पण वरकरणी त्या म्हणाल्या, "बाळा, आधी आपला संसार, मग जगाचा उद्धार! तुझं लग्नच करून टाकते.

संसारात गुंतलास की हे तुझे वाऱ्यावरचे विचार-----."

"लग्न? नको, नको. आई, मी लग्न करणार नाही. जगाच्या कल्याणाचं काम करायला मी मोकळा हिंडणार!" नारायण तावातावाने म्हणाला. त्यावर राणूबाई म्हणाल्या, "हे बघ, तुला लग्नाला उभं राहावंच लागेल. आईची आज्ञा आहे. भानजी मामाची मुलगी मी तुझ्यासाठी ठरवली पण आहे बरंऽऽ!"

## २ : मी आहे रामदास! :

"नारायणाचे लग्न ठरले! नारायणाचे लग्न ठरलेंऽ!" नारायणाचे मित्र चिडवू लागले, "आता काय बुवा, आमच्या नारायणाच्या घरात लाजरी लक्ष्मी येणार आणि मग.... नारायणाची तर मजाच मजा होणार! कसं काय नारबा?"

त्या मित्रांना नारायण म्हणायचा, "गड्यांनो, मी लग्नच करणार नाही; पण आता आईनं ठरवलेलं आहे. तिच्या वचनासाठी मी लग्नाला उभा राहाणार आहे! बस्! तुम्ही मला चिडवणार असाल तर लग्नाला येऊच नका पाहू!"

आसनगावचे भानजीबुवा गोसावी—सूर्याजीपंतांचे मेहुणे—राणूबाईंचे भाऊ! मोठे रामभक्त! कथाकीर्तन करायचे. त्यांनी आपली मुलगी भाच्यालाच द्यायची ठरविली होती. नारायण त्यांना पसंत पडला होता.

आसनगावात लग्नाची तयारी जोरात चालली होती. भानजीबुवांच्या दारापुढे मंडप घातला होता. बोहले केले

होते. जांबगावाहून नवरदेवांचे वऱ्हाड आले. सीमान्तपूजन झाले. मांडव गच्च भरला. नवरा-नवरीमध्ये अंतरपाट धरला गेला. भटजींनी घोषणा केली. "साऽवधान! शुभमंगलऽऽ सावधाऽन!" मंगलाष्टके सुरू झाली.

मंडळी गप्पात रंगून गेली होती. एकमेकींची वस्त्र-भूषणे पाहण्यात स्त्रिया गुंग झाल्या होत्या. शामभटाचे लक्ष रामभटाच्या पगडीकडे होते. मंगलाष्टकांची चढाओढ चालली होती. शेवटी.... तदेव लग्नं.... झालं. वाजंत्री जोरात वाजली. टाळी वाजली. अंतरपाट दूर झाला आणि पाहतात तर काय नवल!




नवरदेव पाटावर नाही! नवरी कोणाला माळ घालणार? अरे, नवरदेव कुठं आहे? "नवरा पळाला?" "नवरा पळाला!!" एकच गलका झाला. जो तो शोधू लागला; पण नवरदेवाचा पत्ताच नाही! छे, छे! हे काय भलतंच झालं!

राणूबाईंच्या तोंडचं पाणी पळालं.

शोध करणारे थकले व हात हालवीत परतले.

नारायण जो निसटला तो जांब गावाजवळ येऊन एका मोठ्या झाडावर गुपचूप लपून बसला. मारुतीने रात्री त्याला दृष्टान्त दिला की, "प्रभू रामचंद्र नाशिकच्या जवळ गोदाकाठी पंचवटीत राहिले होते. तेथे तू जा आणि पुढील जीवन कार्यासाठी तेथे तपश्चर्या कर!"

दोन दिवसांनी नारायण त्या झाडावरून उतरला. रात्रभर वाटचाल करीत पैठणहून गोदाकाठाने तो नाशिकला गेला. पंचवटीजवळील टाकळी या खेडेगावातील नंदिनी-गोदावरीचे संगमस्थान त्याने तपश्चर्येसाठी पसंत केले.

त्याने जवळच्या एका गुहेत मुक्काम केला. पहाटेच उठावे व त्या संगमात स्नान करून गायत्रीमंत्राचा जप करावा. पाण्यातच उभे राहून "श्रीराम जयराम जय जय राम" या तेराक्षरी घोषमंत्राचे आवर्तन करावे. दुपारी पंचवटीत जाऊन पाच घरे भिक्षा मागून जेवावे. सायंकाळपर्यंत रामायण, महाभारत वगैरे ग्रंथांचे चिंतन करावे, असा नित्यनेम चालू होता.

काही लोकांनी नारायणाला विचारले की, "काय रे बटू, तुझं नाव काय? पाण्यात उभा राहून काय करतोस?" त्यावर नारायण म्हणाला, "प्रभू रामचंद्रांच्या भक्तीसाठी मी तप करीत आहे. मी रामाचा दास –रामदास आहे...!"

रामदासाने मग बारा वर्षे तिथे तपश्चर्या केली. गायत्रीमंत्राची तीन पुरश्चरणे व तेराक्षरी या राममंत्राचा तेरा कोटी जप पूर्ण केला. एके दिवशी प्रत्यक्ष प्रभू रामचंद्र

रामदासापुढे येऊन उभे राहिले. रामदासाला दिव्यदर्शन झाले. रामाने दासाच्या मस्तकी वरदहस्त ठेवून आदेश दिला की, “जा, जगाच्या उद्धारासाठी तू शक्ती, भक्ती आणि रामराज्याचे कार्य कर! त्यासाठी मी तुला समर्थ बनवीन!”

## ३ : तीर्थयात्रेतील अनुभव :

जगाच्या उद्धारासाठी कार्य करायचे म्हणजे काय? मारुतीरायासारखी शक्ती, भक्ती आणि सत्‌धर्माचे रामराज्य यासाठी अखंडपणे कार्य करण्याची दिशा धरावी, असा विचार करून रामदास तीर्थयात्रेला निघाले.

नाशिकपासून काशीपर्यंतचा पायी प्रवास करून त्यांनी विश्वनाथाचे दर्शन घेतले. अश्वमेधघाटावर बसून ते चिंतन करू लागले. या प्रवासात त्यांना दिसले–

“हिंदुस्थानात सगळीकडे यवनांचे राज्य पसरलेले असून त्यांनी हिंदू प्रजेचा छळ चालविला आहे. चोर, ठग, लुटालूट करीत आहेत. मंदिरे नष्ट करीत, स्त्रियांना भ्रष्ट करीत यवनी राक्षस फिरत आहेत. अन्याय, अत्याचार यांचा धुडगूस चालू आहे. हिंदू लोक अगतिक होऊन यवनी-राज्यकर्त्यांची सेवा करण्यात धन्यता मानीत आहेत!

“छे, छे! ही परिस्थिती पाहावत नाही! हे सारं आता बंद केलं पाहिजे! दुष्टांचा नायनाट केलाच पाहिजे!” अशा विचारांनी रामदास अस्वस्थ होत. मग त्यांनी ठरविले की, हिंदू जनता संघटित करावी. गावोगाव मारुतीची स्थापना

करून बळाची, भक्तीची जोपासना करावी. रामदासी पंथ स्थापन करून हिंदू जनतेला निर्भय करावे. या निश्चयाला प्रभू रामरायाची कृपा आणि आशीर्वाद मिळावा म्हणून ते प्रार्थना करू लागले.

काशी, प्रयाग, गया इ. तीर्थयात्रा करून रामदास अयोध्येला गेले. शरयू नदीत स्नान करून राममंदिरात –

"दक्षिणे लक्ष्मणोयस्य वामे तु जनकात्मजा
पुरतो मारुतीर्यस्य तं वन्दे रघुनन्दनम्।।"

अशा राममूर्तीचे त्यांनी दर्शन घेतले. त्यांनी मनःपूर्वक प्रार्थना केली, "प्रभो, लोककल्याणाचं कार्य करायला मला समर्थ बनवा!" मग रामरायांनी त्यांना तसा कौल दिला.

नंतर मथुरा, वृंदावन, श्रीनगर, बदरिकेदार, हृषीकेश पाहून हिमालयातील श्वेतमारुतीचे त्यांनी दर्शन घेतले. तेथे त्यांनी अंगावर भगवी वस्त्रे धारण केली. नंतर श्रीकृष्णाची द्वारका, जगन्नाथपुरीची यात्रा करून दक्षिणेकडे रामेश्वर, लंका, किष्किंधा, गोकर्णमहाबळेश्वर, करवीर क्षेत्र असा प्रवास करून रामदास पंढरपुरला गेले.

पंढरपुरला विठोबाच्या ठिकाणी त्यांना प्रत्यक्ष श्रीराम दिसू लागले, तेव्हा आश्चर्याने ते म्हणाले, "प्रभू, तुम्ही इथं एकटेच का उभे? सीतामाई कोठे आहेत? दुष्ट राक्षसांनी जर पुनः सीताहरण केलं तर ह्या संतमंडळींना घेऊन त्या सीतेला-भारतमातेला-सोडविण्यासाठी तुम्ही चला माझ्या-बरोबर! सीताशुद्धीसाठी मला समर्थ करा!"

तीर्थयात्रा आटोपून समर्थ रामदास पुन्हा नाशिक पंचवटीला गेले. तेथे रामप्रभूंना आपले तीर्थाटनाचे पुण्य

त्यांनी अर्पण केले. त्या उत्सवाच्या रात्री एकान्तात पुन्हा रामरायांनी समर्थांना प्रत्यक्ष दर्शन देऊन सांगितले की, "कृष्णातीरी निवास करून लोकोद्धाराचे कार्य करावे."

ती आज्ञा शिरसावंद्य मानून समर्थ म्हणाले, "प्रभो, भारतमातेचं दर्शन झालं. लोकमाता सर्व नद्या, तीर्थे, समुद्र यांच्या पाण्यात स्नाने केली. आता एकदा जन्मदात्या मातेला भेटून नंतर कृष्णातीरी जाईन!"

"तथास्तु!" म्हणून श्रीरामप्रभू गुप्त झाले. नंतर रामदास तेथून निघाले.

## ४ : माऊलीची भेट :

स्वामी रामदास नाशिकहून पैठणला आले. संतश्रेष्ठ एकनाथांची ती पवित्र भूमी. नाथांचे नाथ तिथे भक्तांचे दास होऊन राहिले होते. प्रपंच नेटका करून नाथांनी खरा परमार्थ साधला होता. त्यांनी जनींजनार्दन ओळखला होता. अशा त्या विशेष क्षेत्र प्रतिष्ठानात रामदासांनी मुक्काम ठोकला.

वृंदावनापुढे रामदासांची कीर्तने होऊ लागली. हिंदू धर्माचे महत्त्व, भक्ती आणि बळाची जोपासना या विषयांवर कीर्तने करून लोकांना नवी जाग आणणे, एकजुटीने अन्यायाचा प्रतिकार करणे अशी कामे तेथे त्यांनी मोठ्या चतुराईने चालविली होती.

कीर्तनाला गावोगावची मंडळी येत होती. अशाच एका कीर्तनात जांब गावचे काही लोक आले होते. त्यांतील एकजण आपल्या मित्राला कोपरखळी मारून हळूच म्हणाला,

" हा बुवा आपल्या गावच्या ठोसरांचा—सूर्याजींचा नारायण दिसतो! लग्नातून पळाला होता तो. आता वीस वर्षांनंतर पुन्हा आज इथे दिसला आहे!"

"मलाही तसंच वाटतं! ते त्याच्या कपाळावरचं टेंगूळ पाहा. लहानपणी विहिरीत पोहताना खडक लागून त्याला हे टेंगूळ आलं होतं! नक्की हा नारायणच आहे!" त्या मित्राने अशी खात्री दिली.

कीर्तन संपल्यावर त्या दोघांनी रामदासांना एकान्तात गाठले. जोशी म्हणाला, "शाबास रे नारायणा! अरे, तू लग्नाच्या वेळी जो पळालास तो आज दिसलास! तुझी आई तुझी वाट पाहून पाहून थकली. ती आता आंधळी होऊन अंथरुणावर पडली आहे! तिची एकदा शेवटची तरी भेट घे रे! बुवा बनून फिरतोस आणि आपल्या आईला विसरतोस! लोका सांगे ब्रह्मज्ञान आणि आपण कोरडा पाषाण! वाहवा!"

त्यावर रामदास गंभीर होऊन म्हणाले, " जोशी, तू मला ब्रह्मज्ञान सांगू नकोस! मी जर तो नारायण नसेन तर...?"

"अरे नाहीस कसा! तुझं ते टेंगूळ सांगतंय् की जांब गावच्या सूर्याजींचा नारायण तूच आहेस! बाबारे, आता वेड पांघरू नकोस! आई – राणूबाईचं – नाव घेताच तुझ्या डोळ्यांत टचकन पाणी आलं, ते मी पाहिलंय!

"मायेशिवाय कढ नसतो बाबा! जांबगावाला चल आणि त्या माऊलीची भेट घे!" जोशी अगदी खडसावून म्हणाला.

रामदास स्वामी मग त्याला थोपटीत म्हणाले, "अरे, मी त्यासाठीच आलो आहे इकडं! माझ्या आईची मी भेट घेणारच आहे! हा पाहा मी लगेच निघालो!

'मनोजवंऽमारुततुल्य वेगं-------'."

मग अगदी भल्या पहाटेच जांब गावात कुलकर्णी ठोसरांच्या वाड्यापुढे " जयजय रघुवीरऽसमर्थऽऽ!" अशी घोषणा झाली. घरातून सुवासिनीने सूपभर धान्य भिक्षा आणली. ती पाहून स्वामी म्हणाले, " भिक्षा नको. पार्वती वहिनी, श्रेष्ठी कुठे आहेत? आणि आई----?"

ते शब्द ऐकताच पार्वती घरात पळाली आणि म्हातारीला बिलगून म्हणाली, " सासूबाई, सासूबाईऽऽ.. अहो, दाराशी आलेले स्वामी.... आपले नारायण भाऊजीऽऽ"

"काय? कायऽ म्हणतेस? नारायणऽ अगं माझा नारायण आला आहे? तरीच बरंऽऽ मी तो आवाज ऐकला व ओळखलासुद्धा! अरे नारायणाऽऽ बाळा, कुठं आहेस रे ? ये ना! मला भेट रे."म्हणत म्हातारी धडपडून उठू लागली.

तेवढ्यात "आईऽऽ मी आलो आहे गऽ मी तुझा नारायण!" असे म्हणून धावत येऊन रामदासांनी त्या माऊलीला मिठी मारली.मग ती म्हातारी आपल्या बाळाला गोंजारीत म्हणाली, "नारायणा, कुठं रे गेला होतास? अरे, तुझी वाट पाहून पाहून माझे डोळे गेले रे! मी आंधळी झाले. माया आंधळी असते. मी तुला आता कशी पाहू? आणि हे काय, जटा, दाढी, माळ? एखाद्या भुतानं तर तुला झपाटलं नाही ना?"

"होय आई! ते भूत मोठं जबर आहे! त्या भुताचा पाय शिळेला लागला तर त्या शिळेतून एक बाई निर्माण झाली. त्याच्या नावाचे दगड समुद्रात तरंगू लागले. त्यानं दुष्टबुद्धी लंकाधीशाचा नाश केला, आणि काय सांगू आईऽऽ..."

"काही सांगू नकोस! तू हे प्रभू रामचंद्राबद्दलच सांगत आहेस! तुला त्या रामनामाचं वेड लागलं आहेऽऽ"

"होय आई! मला प्रत्यक्ष रामप्रभूंनी दर्शन दिलं आणि जगाच्या कल्याणासाठी कार्य करण्यास समर्थ केलं. मी रामदास आहे! देव, देश व धर्माची सेवा करण्यात मी माझं आयुष्य घालविणार आहे!"

"कर बाबा, तुझ्या मनाला येईल तसं कर! पण आज तू आलास, मला भेटलास, आता आनंदानं मी.... पण.... मी तुला पाहू शकत नाही रे! माझे डोळे...."



रामदासांनी मग आपल्या कमंडलूतील गंगाजळ आईच्या डोळ्यांना लावले. योगसामर्थ्य पणाला लावून आईच्या डोळ्यांवरून हात फिरविलं, तोच काय चमत्कार ! राणूबाईला दिसू लागले. तिला नवी दृष्टी आली. तिने आपल्या बाळाला डोळे भरून पाहिले आणि त्याला कडकडून

मिठी मारली. ती म्हणाली, "अहाहा! रामदासा, तू आता जगालाही नवी दृष्टी देशील! समर्था, तुला आशीर्वाद!"

नंतर काही दिवस रामदास जांब गावात राहिले. बंधू गंगाधर श्रेष्ठी आणि मित्रांच्या भेटीगाठी झाल्या. सर्वांचा निरोप घेऊन ते कृष्णातीराकडे निघाले. त्यावेळी "जयजय रघुवीर समर्थ!" या घोषणांनी आसमंत दुमदुमून गेला.

## ५ : तिसरे ते सावधपण :

जांब गावाहून निघून रामदास दक्षिणेकडे कृष्णाकाठाने संचार करू लागले. त्यावेळी त्या भागात विजापुरच्या आदिलशहाचा अंमल होता. पोर्तुगीज लोक हिंदूंना छळीत होते. तथापी आदिलशहाच्या सेवेत राहूनही शहाजी भोसले हा प्रतापी मराठा स्वराज्यासाठी खटपट करीत होता.

तिकडे पुणे—मावळ भागात शहाजीची बायको जिजाबाई आणि पुत्र शिवाजी यांनी स्वराज्यस्थापनेचे प्रत्यक्ष कार्य चालविले होते. सुलतानशाहीचे जुलमी जोखड झुगारून स्वतंत्र होण्यासाठी महाराष्ट्रीय लोक आतुर झाले होते. त्यांना शिवाजीसारखा नेताही लाभला होता. आणि शिवाजीला समर्थ रामदासांसारखा राष्ट्रगुरू लाभला होता. ही परिस्थिती धर्मराज्यासाठी अनुकूल होती.

रामदासस्वामी कृष्णा खोऱ्यात फिरत होते. भक्ती, शक्ती व सुराज्य यांचा प्रचार कीर्तनातून करीत होते. महाबळेश्वर, माहुली, मसूर असा त्यांचा फिरता कार्यक्रम होता. मसूरला त्यांनी शक्ति-भक्तीचा आदर्श अशा

मारुतीची स्थापना केली. अनेक गावी मारुतीची मंदिरे व रामजन्मोत्सवाचे कार्यक्रम सुरू केले.

राममंदिरात रामापुढे हात जोडून बसलेला मारुती तर स्वतंत्र मंदिरात एका हातावर पर्वत, एका हाती गदा घेतलेला, कुठे पायातळी राक्षस रगडलेले व एक हात उगारलेला अशा विविध प्रकारच्या भावार्थपूर्ण मारुतीच्या भव्यमूर्ती रामदासांनी स्थापन केल्यां.

"मुख्य हरिकथा निरूपण । दुसरे ते राजकारण ।
तिसरे ते सावधपण । सर्व विषयी ।।"

याच प्रबळ हेतूने समर्थांनी कृष्णेच्या परिसरात कार्य केले. ठिकठिकाणी मठ स्थापून रामसेवकांची फौज उभारली.

त्या वेळी महाराष्ट्रात कृष्णा खोऱ्यात, पुणे भागात, जयराम स्वामी, आनंदमूर्ती, रंगनाथस्वामी, केशव स्वामी ही संतमंडळी तसेच देहूचे तुकाराम महाराज, चिंचवडचे चिंतामणी गोसावी वगैरे साधुपुरुष धर्मप्रसाराचे कार्य नव्या जोमाने, निष्ठेने करीत होते. समर्थ रामदासांच्या आणि त्यांच्या गाठीभेटी होत असत.

"धर्मस्थापनेचे नर । ते ते ईश्वराचे अवतार!"

असे म्हणून समर्थांनी त्यांचा गौरव केला. शिवाजीच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यात भगवंताच्या अधिष्ठानाचे सामर्थ्य मिळाले. देशभक्तीला ईश्वरभक्तीची जोड मिळाली.

देहूच्या तुकाराम महाराजांची समक्ष भेट घेऊन शिवाजीने त्यांना आपले गुरू मानले होते. तसेच आता समर्थ रामदासांची भेट घेऊन त्यांचा गुरूपदेश घ्यावा असे

शिवाजीने ठरविले; पण रामदास फिरते असायचे. डोंगराडोंगरांतून ते फिरायचे, कुठे घळीत राहायचे. त्यांची भेट कधी आणि कशी होणार?

तेवढ्यात एके दिवशी अचानक रामदासांचा एक शिष्य पत्र घेऊन शिवाजीकडे आला. काय नवल! ते आशीर्वादपत्र वाचून शिवाजीला खूपच आनंद झाला. राजकारणाचा उत्साह वाढला. त्या पत्रात लिहिले होते –

"या भूमंडळाचे ठायी । धर्म रक्षी ऐसा नाही ।
महाराष्ट्र धर्म राहिला काही । तुम्हांकरिता ।।
महायत्ने सावधपणे । समई धारिष्ट धरणे
अद्भुतची कार्य करणे । देणे ईश्वराचे ।।
मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा..."

ते पत्र वाचून शिवाजीला त्या राष्ट्रगुरू रामदासांच्या भेटीची आतुरता लागली. स्वराज्याच्या कार्यात अखंड सावधानता ठेवूनच शिवाजीराजे वागू लागले.

❀ ❀ ❀

## ६ : समर्थशिष्य कल्याण :

धर्मनिष्ठा आणि स्वराज्यप्रेम यांसाठी अखंड सावधानपणे कार्य करणारे अनेक शिष्य समर्थांना मिळाले. हजारो रामदासी सेवकांची फौज मठामठांतून राहात होती. त्या सेवकांत टाकळीचा उद्धव आणि कोल्हापूरचा कल्याण हे समर्थांचे आवडते शिष्य.

पंचवटीजवळच्या टाकळी गावी रामदासांनी बारा वर्षे रामनामाची तपश्चर्या केली. त्या वेळी तेथील दशपुत्रे यांना रामरायाच्या कृपेने झालेला पहिला मुलगा, उद्धव याला दशपुत्रेंनी पुढे रामदास्वामींना अर्पण केला. कृष्णाकाठी आल्यावर समर्थांनी उद्धवाला आपला शिष्य म्हणून सतत जवळ बाळगला होता.

नंतर कोल्हापूर मुक्कामी समर्थांना अंबाजी नावाचा एक निष्ठावान शिष्य मिळाला. तोच पुढे कल्याण या नावाने प्रसिद्ध झाला. त्याची ही कथा!

दक्षिणेकडील भ्रमंतीत एकदा रामदासांचा कोल्हापूर गावी मुक्काम पडला. ज्या घरी ते राहिले त्या घरमालकाचा भाचा अंबाजी स्वामींची सेवा करू लागला. पूजेची मांडणी करणे, पाट-रांगोळ्या, भोजनाची व्यवस्था करणे अशी कामे तो करू लागला. त्याचे ते झटपट काम करणे, गोड बोलणे, नम्रपणे वागणे समर्थांना खूपच आवडले.

अंबाजीचे अक्षर फारच सुंदर होते. समर्थांनी विचार केला की, आपल्या ग्रंथलेखनाच्या कामी हा शिष्य फार उपयोगाचा होईल. मग त्याच्या मामाची परवानगी घेऊन समर्थांनी त्याला आपल्याबरोबर नेले.

मसूर येथे रामनवमीचा थाटाचा उत्सव चालू होता. रामरायाची मूर्ती रथात ठेवली होती. मिरवणूक चालली होती. वाटेत एका मोठ्या आम्रवृक्षाची फांदी रथाला आडवी येणार होती. ती तोडल्याशिवाय गत्यंतर नव्हते.

मग अंबाजी पुढे झाला. तो समर्थांना म्हणाला, "मी तोडू का ती फांदी?" "तोड कीऽ पण जरा जपून बरंऽऽ"

समर्थांनी परवानगी दिली. अंबाजीने कुऱ्हाड आणली. तो सरसर झाडावर चढला. ती फांदी तो तोडू लागला.

तेव्हा आक्काबाई—वेणूबाई ह्या समर्थशिष्या त्याला म्हणाल्या, "जपून तोड रे बाबा. तोल संभाळ! तिकडे बाजूला विहीर आहे! झोक गेला तर ......"

तेवढ्यात काडकन् ती फांदी मोडली आणि अंबाजीला घेऊन ती बाजूच्या विहिरीत पडली. मग काय? एकच गोंधळ उडाला." अंबाजी बुडालाऽ अंबाजी मेलाऽऽ"

तेवढ्यात समर्थ पुढे झाले. विहिरीत डोकावून ते म्हणाले, "अरे अंबाजीऽ कसं काय रे बाबा? तुझं..." आतून आवाज आला,"कल्याण आहे! कल्याण आहे होऽ" समर्थ म्हणाले, "पाहा, अंबाजीचा आता कल्याण झाला आहे." तेव्हापासून त्याचे नाव कल्याण असेच ठेवले गेले.

लोकांनी त्याला विहिरीतून सुखरूप बाहेर काढले. आडवी आलेली फांदी बाजूला काढली आणि मग तो रामाचा रथ थाटाने, आनंदाने मिरवत पुढे गेला.

***

समर्थांनी आपल्या शिष्यांची एकदा परीक्षा पाहिली. ऐन मध्यरात्री समर्थ मोठ्याने विव्हळू लागले, ते म्हणाले, "आई आई गऽ अरे, माझ्या पायाला एकदम मोठे गळू आले रे. मी त्याच्यावर पट्ट्या बांधल्या; पण ठणका थांबत नाही रेऽऽ"

सारे शिष्य उठून आले. त्यांनी समर्थांचा सुजलेला पाय पाहिला. समर्थ म्हणाले, " कोणीतरी ह्या गळूतला पू चोखून घ्या रेऽऽ त्याशिवाय मला आराम पडणार नाही रेऽऽ"

"पू तोंडाने चोखून घ्यायचा? छेः छे शीः घाण!" असे

म्हणून शिष्यांनी तेथून पाय काढला. एकटा कल्याण तेथे थांबला. त्याने पट्ट्या सोडल्या. शेवटच्या पट्टीला तोंड लावून त्याने सुर्रऽसुर्र चोखली तर काय नवल! समर्थांनी तेथे एक पिकलेला आंबा बांधलेला होता. त्याचा रस कल्याणाने चोखून घेतला. त्या कसोटीत कल्याणच उत्तीर्ण झाला.

## ७ : एकसष्ट होनांची गोष्ट :

एकनाथ नावाचा एक तरुण. लग्न झालेलं. घरात आईवडील म्हातारे. उद्योगधंदा काही नाही. गावात काहीतरी नोकरीचाकरी करावी; पण चार माणसांचं भागेचना!

मग एकनाथानं गाव सोडला. दूरच्या मोठ्या गावात एकनाथाला काम मिळालं. त्याचं अक्षर सुंदर होतं! एका श्रीमंत शेटजींच्या दुकानी जमाखर्च लिहिण्याचं काम. सुरेख लेखन. बिनचूक हिशेब. शेटजी एकदम खूष!

वर्ष झालं. एकनाथानं एकसष्ट होन शिल्लक साचविली. दिवाळी जवळ आली. आता आनंदानं घरी गेलं पाहिजे. एकनाथानं मालकाची परवानगी घेतली. प्रवास सुरू झाला.

"वाटेत सज्जनगड आहे. तिथं समर्थ रामदासांचा निवास आहे. त्यांचं दर्शन घ्यावं, नंतर गाव गाठावं!" असा एकनाथानं विचार केला. तो सज्जनगडावर गेला.

त्या वेळी समर्थ रामघळीत होते. दास डोंगरी राहतो! समर्थशिष्य कल्याणानं एकनाथाला रामघळीत नेलं. एकनाथानं समर्थांचं दर्शन घेतलं. खूप आनंद वाटला.

एकनाथानं आपली कथा समर्थांना सांगितली. "शेटजींच्या कृपेनं एकसष्ट होन शिल्लक साचली. आता गावी जाऊन दिवाळी आनंदात करायची." असं तो म्हणाला.

एकनाथ म्हणाला, "बरंय! येतो मग! निघतो!"

"वारे वा! म्हणे निघतो! दुपारची वेळ झाली आहे! इथं-स्वयंपाक तयार आहे. रामरायाचा प्रसाद आहे. जेवून जा!" समर्थांनी आज्ञा केली. एकनाथ थांबला.

तेवढ्यात सभोवतालच्या गावागावातील ब्राह्मणांचा एक भला मोठा थवा समर्थांच्या दर्शनासाठी तिथं आला. समर्थांनी त्या ब्राह्मणांचे स्वागत केलं. दर्शन कार्यक्रम झाला. समर्थ म्हणाले,"आता दुपार झाली आहे.रामरायाचा प्रसाद सारेजण घेऊन जा! अन्नदानाचं पुण्य अनायासेच मला मिळेल. मग सारे थांबले.

"आता इतक्या माणसांचा स्वयंपाक होणार कधी आणि आपल्याला जेवायला मिळणार कधी?" याचा विचार करीत एकनाथ स्वस्थ बसून राहिला. तेवढ्यात शिष्य कल्याण म्हणाला, "चला, ब्राह्मण मंडळी, जेवायला चला! पहिली पंगत ब्रह्मवृंदाची, नंतर इतरांची! चलाऽउठा!"

पत्रावळी मांडल्या. पानं वाढली. पंगत बसली. रामरायाला नैवेद्य झाला.'वदनि कवळ घेताऽ...' झालं. ब्राह्मण जेऊन तृप्त झाले. श्लोक झाले. यथासांग झालं.

समर्थांनी विचार केला, "आता या ब्राह्मणांना भोजनदक्षिणा दिली पाहिजे. प्रत्येकी एकेक होन म्हणजे किती? मोजून पाहिलं तर एकसष्ट ही संख्या! आता? आपल्याजवळ तर इथं एकही होन नाही! मग?"

समर्थांना एक कल्पना सुचली. त्यांनी एकनाथकडे पाहिलं. त्याला बाजूला नेलं आणि हळूच सांगितलं की, "अरे, तुझ्याजवळ एकसष्ट होन आहेत, ते मला दे बरं! ते या ब्राह्मणांना दक्षिणा म्हणून द्यायचे आहेत! देऽऽ"

आली का पंचाईत! समर्थांच्या अनपेक्षित मागणीमुळं एकनाथ खोड्यात पडला. तो घुटमळत म्हणाला, "म...म...माझे एकसष्ट होन...पप ..पण ..त ..त.."

"हे बघ तत पप करू नकोस. दे ते एकसष्ट होन! ब्राह्मण जेवले आहेत. आता ते उठतील. त्यांना भोजनदक्षिणा दिली पाहिजे, तरच या अन्नदानाची सांगता होणार आहे!"

एकनाथ पुन: विचार करू लागला की, "जर हे होन दिले नाहीत तर समर्थांचा अपमान होईल. ते रागावतील आणि जर हे दिले तर... घरी काय नेणार! मग दिवाळी...?"

तेवढ्यात समर्थांनी घाई केली. ते म्हणाले, "अरे, लौकर दे! तुझ्या हातांनी ते एकसष्ट होन यांना देऊन टाक! मग काय करणार! एकनाथाने ते एकसष्ट होन काढले आणि मोठ्या नाखुशीने समर्थांना देऊन टाकले. मग ते होन त्या एकसष्ट ब्राह्मणांना भोजनदक्षिणा म्हणून दिले गेले.

ब्राह्मण निघून गेले. इतरांची जेवणे झाली. एकनाथानं रामरायाचा प्रसाद म्हणून कसे तरी चार घास गिळले. स्वयंपाकाची निरवानिरव झाली. संध्याकाळ होत आली. समर्थांची स्वारी सज्जनगडावर गेली. एकनाथही त्यांच्या मागोमाग गेला. आपले एकसष्ट होन आता आपल्याला परत मिळतील या आशेने तो समर्थांभोवती घुटमळू लागला. पण कसलं काय! समर्थ त्याबद्दल काहीच बोलले नाहीत.

रात्री एकनाथाला झोप कसली, तळमळ, चिंता! सकाळ झाली. जो तो आपल्या कामाला लागला. समर्थांची दिनचर्या सुरू झाली. त्या होनाबद्दल ते काहीच बोलेनात!

मग एकनाथानं समर्थांचं दर्शन घेतलं. तो म्हणाला, "निरोप घ्यायला आलो. निघतो आता! येऊ का?"

समर्थ म्हणाले, "या, या! येत चला असेच! आणि होऽ तू काल मला अगदी वेळेवर एकसष्ट होन दिलेस ना, छान झालं! गरजेच्या वेळी असंच दुसऱ्यांच्या उपयोगी पडावं! कल्याणच होतं त्यामुळं! बरं, आता कधी येणार पुन:?"

त्या बोलण्यामुळं एकनाथाला समर्थांचा मनातून खूप राग आला, पण काय करणार! तो गुपचूप निघून गेला. तो सायंकाळी कसाबसा गावी पोहोचला. आता रिकाम्या हातानं घरी तरी कसं जायचं म्हणून तो बाहेर मारुतीच्या देवळात, अंधारी कोपऱ्यात पडून राहिला.

मध्यरात्री एकनाथाच्या घरी स्वत: समर्थ गेले. त्यांनी एकनाथाच्या वडिलांना ते एकसष्ट होन दिले. हकीगत सांगितली आणि त्या त्यागाचे बक्षीस म्हणून आणखी वर एकसष्ट होन दिले व समर्थ निघून गेले.

एकनाथ निराशेने घरी परतला. त्याच्या वडिलांनी समर्थांचे उपकार सांगून त्याच्या हातावर ते एकशेबावीस होन ठेवले. मग मात्र एकनाथ थक्कच झाला. समर्थांनी त्याची परीक्षा पाहिली होती, हे आता त्याला कळालं. त्याचे डोळे डबडबले आणि तो वडिलांना कडकडून भेटला! पुढं ही एकसष्ट होनांची कथा तो ज्याला त्याला सांगू लागला.

❀ ❀ ❀

## ८ : भगवे निशाण फडफडले! :

रामदास स्वामींची भेट घ्यावी म्हणून स्वतः शिवाजीराजे चाफळ भागात फिरत होते. एका गावात रात्री गिरिगोसावी यांचे कीर्तन ऐकून राजे प्रसन्न झाले. त्यांनी गिरिगोसावी यांना तीनशे होन दिले.

ते तीनशे होन राजांना परत करून गिरिगोसावी म्हणाले, "शिवबा, आम्ही ही भगवी वस्त्रं धारण करून देवधर्म-प्रचाराचे कार्य करणारे! आम्हाला धनाचा लोभ नाही! हे तुझे संपत्तिदान तिकडे चाफळच्या राममंदिराकडे जाऊ दे! समर्थ रामदासस्वामी तेथे राष्ट्रधर्म-प्रसाराचे कार्य करीत आहेत. त्यांना तू भेट!"

रामदासांचा ठावठिकाणा आता कळाला. मग शिवाजीराजे बाळाजी चिटणीस आणि निळो सोनदेव यांना बरोबर घेऊन चाफळला गेले; पण त्या वेळी समर्थ शिंगणवाडीला असल्याचे त्यांना कळाले.

शिंगणवाडीजवळ एका औदुंबर वृक्षाखाली समर्थ दासबोध ग्रंथाची रचना करीत होते. तेथे जाऊन राजांनी रामदासांची भेट घेतली. दोघांनाही त्या भेटीचा खूप आनंद वाटला. त्या वेळी त्या दोघांत पुढीलप्रमाणे संवाद झाला.

शिवबा : स्वामी आपण माझे गुरू! यापुढं आपल्या सेवेत सतत राहावं आणि जीवनाचं सार्थक करावं...."

रामदास : म्हणजे ? तुझा धर्म तू सोडणार की काय?"

शिवबा : धर्म? छे,छे! धर्म कसा सोडणार! नाही, नाही.



रामदास : अरे, तुझा धर्म म्हणजे राजधर्म! शिवबा, क्षत्रियांचा धर्म म्हणजे राज्य स्थापन करून आपला देव, देश व धर्माची वाढ करणं, प्रजेचं पालन करणं! तो धर्म सोडून तू माझी सतत सेवा करणार—म्हणजे काय पोथ्या लिहीत बसणार की काय?

शिवबा : नाही. स्वामी तसं नाही पण....

रामदास : आता पण हाच! महाराष्ट्र धर्म वाढवावा! राजे, तुम्ही क्षात्रधर्म वाढवावा. भवानीमातेला मी रोज प्रार्थना करीत असतो की, 'तुझा तू वाढवी राजा, शीघ्र आम्हांचि देखता' भवानीमातेनं तुमच्या हातीं तलवार दिली आहे. तुमच्या अंगी तिचा संचार आहे. तिच्या मार्गदर्शनानं तुम्ही कार्य करावं. आमचे आशीर्वाद आणि साहाय्य तुम्हांला लाभणारच!

समर्थदर्शन घेऊन राजे निघाले. समर्थांनी त्यांना प्रसादाचा

नारळ दिला. घरी गेल्यावर महाराजांनी तो नारळ जिजाबाई माँसाहेबांच्या हाती दिला आणि समर्थभेटीची सारी हकीगत त्यांना सांगितली.

एकदा शिवाजी महाराज साताऱ्याला होते. त्या वेळी माहुलीहून समर्थ साताऱ्याला गेले. महाराजांच्या वाड्यापुढे जाऊन समर्थांनी घोषणा केली –

"जय जय रघुवीर समर्थ! दासाला भिक्षाऽऽ"

राजांनी पाहिले," आज ही नामी संधी लाभली आहे!" विचार केला आणि एक सनद स्वहस्ते लिहून आणली. समर्थांच्या झोळीत ती दान म्हणून टाकली.

समर्थांनी ती सनद वाचली आणि ते राजांना म्हणाले, "शिवबा, हा कागद मला कशाला दिलास?" शिवाजी राजे म्हणाले, "स्वामी, हे महाराष्ट्र राज्य मी तुम्हांला अर्पण केले आहे! आता या राज्याचे स्वामी आपणच!"

"अस्सं! म्हणजे हे राज्य मला देऊन तू काय उद्योग करणार आहेस?" समर्थांनी विचारल्यावर राजे म्हणाले, "मी आपला दास! सांगाल ती सेवा करीन!"

"होय ना! ठीक आहे! आता हे राज्य माझं झालं. आता मी आज्ञा करतो की," हे राज्य तूच चालविलं पाहिजे. देव, देश आणि धर्म यांच्यासाठी तू अहोरात्र सेवा कर! आणि मी सांगतो त्या गोष्टींची ताबडतोब अंमलबजावणी कर!

"महाराष्ट्रसेनेच्या अग्रभागी भगवे निशाण फडफडले पाहिजे. प्रत्येक किल्ल्यावर भगवा ध्वज फडफडला पाहिजे. महाराष्ट्र राज्याचा झेंडा भगव्या रंगाचा असला पाहिजे कारण हा ध्वज त्यागाचे प्रतीक आहे. आमच्या ह्या वैराग्याचे

ते चिन्ह आहे. हिंदवी स्वराज्याची ती शान आहे.

"दुसरे म्हणजे आतापर्यंत एकमेकांना भेटताना जोहार हा शब्द म्हणण्याची चाल चालू आहे, ती आता यापुढे बदलून एकमेकांना भेटताना "रामराम" हा शब्द वापरला पाहिजे. "रामराम" म्हणजे नमस्कार! यामुळे सहजच मुखी रामनाम येऊन प्रेमादराची वाढ होईल."

स्वामींच्या आज्ञेप्रमाणे शिवाजीराजांनी त्या दोन्ही गोष्टी आपल्या राज्यात ताबडतोब अमलात आणल्या आणि आपल्या त्यागाचा मान राखला. महाराष्ट्राची राजधानी रायगड आणि स्वामींचा निवास-परळीचा किल्ला –सज्जनगड या दोन्ही ठिकाणी भगवे निशाण फडफडले.

शिवाजी महाराजांनी मग राज्यकारभारात समर्थ रामदास – राष्ट्रगुरूंचा सल्ला घेऊन त्याप्रमाणे वागण्याचा सेवाधर्म आजन्म पाळला. रामदासांनी स्वतःचा प्रपंच न करता महाराष्ट्र राज्याचा प्रपंच शिवाजीराजे यांच्यामार्फत अगदी नेटका असा केला.

राजे शिवाजी आणि स्वामी रामदास यांच्या वारंवार भेटी होत असत. त्या भेटीत कधी कुबडी तीर्थ निर्माण झाले तर कधी मोठ्या दगडाच्या आत एका बेडकीचे पोषण श्रीरामाच्या कृपेने कसे होते याचे एक उदाहरण दाखवून महाराजांना चकित केले. अशा अनेक गोष्टी घडल्या. "भगवे निशाण फडफडले" याचा अर्थ शिवाजी राजे आणि समर्थ रामदास या दोघांच्याही त्यागाचे मूर्तिमंत उदाहरणच घडले. भगवा ध्वज हा महाराष्ट्राच्या स्फूर्तिकीर्तीचे मानचिन्ह ठरला.

## ९ : देह गेला कीर्ती उरली :

ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी, शके १५९६ (इ.स. १६७४) रोजी रायगडावर शिवाजी महाराजांना राज्याभिषेक झाला. सर्वांना खूप आनंद झाला. महाराजांनी प्रतापगडावर भवानी देवीची स्थापना केली. मराठ्यांचे स्वतंत्र राज्य झाले. सर्वत्र भगवा ध्वज डौलाने फडकू लागला.

त्या प्रसंगाचे वर्णन करताना समर्थांनी लिहिले की, महाराष्ट्राचे आता आनंदवनभुवन झाले आहे!

"देव भक्त एक जाले । मिळाले जीव सर्वही ।
संतोष पावले येथे । आनंदवनभुवनी ।।
बुडाले सर्वही पापी । हिंदुस्थान बळावले।
निर्मळ जाहली पृथ्वी । आनंदवनभुवनी ।।

आता माझ्या जन्माचे सार्थक झाले! स्वप्न साकार झाले. महाराष्ट्रात सर्वत्र नवीन उत्साह पसरला. पश्चिम सागर आनंदाने उचंबळू लागला.

पण नंतर चैत्रशुद्ध पौर्णिमा-हनुमान जयंती शके १६०२ (इ.स. १६८०) या दिवशी छत्रपती शिवाजी महाराज इहलोक सोडून गेले. सारा देश शोकसागरात बुडाला.

समर्थ रामदासस्वामी दुःखाने अबोल झाले. मध्यंतरी त्यांच्या मातोश्री राणूबाईंचाही अंत झाला होता. त्यांचे बंधू गंगाधर श्रेष्ठी हेही निजधामाला गेले होते; परंतु त्या दुःखापेक्षाही राष्ट्रकुटुंबाचा कर्ता महापुरुषच, त्यांचा परमशिष्य, शिवाजी महाराज गेल्याचे दुःख समर्थांना फारच झाले. त्यांचा जणू प्राणच गेला!

शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजी राजे महाराष्ट्राच्या सिंहासनावर आले. त्यांनी रागारागाने काही मराठे कर्ते सरदार अपमानित केले. नादान कलुषाच्या नादी लागून राज्यकारभार बिघडवून टाकला. सारा महाराष्ट्र काळजीने काळवंडून गेला.

समर्थांना संभाजी राजांबद्दल खूपच चिंता वाटू लागली. त्यांनी राजांना एक उपदेशपर पत्र पाठविले –

"अखंड सावधान असावे । दुश्चित्त कदापी नसावे ।
काही उग्रस्थिती सोडावी । काही सौम्यता धरावी ।।
आहे तितके जतन करावे । पुढे अधिक मिळवावे ।
महाराष्ट्र राज्य करावे । जिकडे तिकडे ।।
लोक बहुत शोधावे । त्यांचे अधिकार जपावे ।
जाण जाणोनी धरावे । जवळी दुरी ।।
शिवराजाचे आठवावे रूप ।
शिवाराजाचा आठवावा प्रताप
शिवराजाचा आठवावा साक्षेप। भूमंडळी ।।

त्या पत्राला संभाजी राजांनी शिरसावंदन केले आणि "स्वामींच्या आज्ञेप्रमाणे करतो!" असा नम्रपणाचा निरोप पाठविला. तेव्हा समर्थांना आनंद झाला. पण शंभू राजे आणि समर्थ यांच्या समक्ष भेटीचा कधीच प्रसंग आला नाही.

शिवाजी महाराजांचे सावत्र बंधू व्यंकोजीराजे तंजावर येथे होते. त्यांनी समर्थ रामदास स्वामी यांना कर्नाटकातून श्रीरामाच्या सुंदर मूर्ती पाठविल्या. त्या सज्जनगडावरील राममंदिरात ठेवण्यात आल्या. त्या मूर्तीकडे सतत पाहून ध्यान लावून समर्थस्वामी चिंतन-मनन करू लागले –

"रामराया, महाराष्ट्राचे राज्य स्वतंत्र झाले आहे. देव, देश आणि धर्म यांच्या जोपासनेचे महान कार्य शिव छत्रपतींनी केले आहे. अष्टप्रधान आणि कारभारी हिंदवी स्वराज्याची चांगली व्यवस्था करीत आहेत. माझे ध्येय पूर्ण झाले आहे. माझे कार्य संपले आहे!

"आता हे राज्य, ही व्यवस्था, महान कार्य बिघडू नये म्हणून रामराया, तू सर्वांना बुद्धी दे रे! माझ्या मनाला ती चिंता का बरे जाळीत आहे?" असे पुटपुटत ते नेहमी अस्वस्थ राहात होते.

एके दिवशी समर्थांनी आपल्या शिष्यांना जवळ बोलावले आणि सांगितले की, " हे पाहा, माझा हा दासबोध ग्रंथ लिहून पूर्ण झाला आहे. माझा देह आता क्षीण झाला आहे. जन्मा आलेला प्राणी जाणार आहे; पण –

आत्माराम दासबोध । माझे स्वरूप स्वतः सिद्ध ।
असता न करावा खेद । भक्त जनीं ।

शरीर नाशिवंत असते, त्याचे दुःख करू नका, पण "मरावे परी कीर्तिरूपे उरावे!" हे वचन साध्य झाले पाहिजे. आनंदवनभुवनात गावोगाव मारुतीची स्थापना झाली. आखाडे झाले. राममंदिरे व रामदासी मठ स्थापन झाले.

"आता तुम्ही यापुढे शक्ती, भक्तीची जोपासना करावी. गावोगाव फिरून देव, देश आणि धर्म यांचे कार्य करावे. माझे अवतार कार्य संपले आहे. मी आता श्रीरामचरणी विलीन होणार आहे तथापि –

"माझी काया आणि वाणी। गेली म्हणाल अंत:करणी -
परी मी आहे जगज्जीवनी । निरंतर ।।

हे लक्षात ठेवून तुम्ही सर्वांनी वागावे!"

माघ वद्य नवमी शके १६०३ (सन १६८१) रोजी समर्थांनी आपल्याभोवती सारे शिष्य बसविले. त्यांच्याकडून रामनामाचा अखंड जप करविला त्यांनीही स्वतः तो जप एकवीस वेळा केला आणि भर दुपारी देह त्याग करताना "जय जय रघुवीर समर्थ" अशी घोषणा करता करताच मान टाकली. समर्थ श्रीरामचरणी विलीन झाले.

एका दिव्य विभूतीचा आत्मा अनंतात निघून गेला. समर्थांचा देह दहन करून त्या ठिकाणी समाधी मंदिर झाले. संभाजी महाराजांनी सज्जनगडावर येऊन त्या समाधीचे दर्शन घेतले आणि दरसाल समर्थांच्या पुण्यतिथीचा—दास-नवमीचा उत्सव चालू ठेवण्यास वर्षासने करून दिली. समर्थांचा देह गेला; पण त्यांची कीर्ती अखंड राहिली आहे!

❀ ❀ ❀

## १० : समर्थांच्या आठवणी :

### -१- रामदासी मठ

हरिकथा निरूपण आणि राजकारण यांचा संगम असलेली रामदासी शक्तिस्फूर्तिकेंद्र म्हणजे समर्थांनी ठिकठिकाणी स्थापन केलेले मठ!

महाराष्ट्रात असे शेकडो मठ आहेत. त्यांपैकी पुढील मठ आणि त्यांची व्यवस्था पाहणारे त्या काळचे प्रसिद्ध रामदासी महंत याप्रमाणे होते —

टाकळी - उद्धव; डोमगाव - कल्याण; तंजावर -

भीमस्वामी; शिरगाव - दत्तात्रय; तिसगाव पाथर्डी - दिनकरस्वामी; कण्हेरी - वासुदेव; दाहेगाव - देवदास; भालगाव - त्रिंबकराज; कारंजे - बालकराम; सज्जनगड - अक्काबाई; मिरज - वेणाबाई.

याशिवाय पुढील रामदासी मठ प्रसिद्ध आहेत–

जांब, चाफळ, परळी, इंदूर-बोधन, निलंगे, राशिवडे, शिरवळ, वाळवे, तेलंगण, मनपाडळे, धोंडराई-गेवराई, मादलमोही (बीड) पारगाव, मन्यारगुडी.

## -२- समर्थांनी स्थापन केलेले मारुती

समर्थ रामदासांनी स्थापन केलेले मारुती पुढीलप्रमाणे प्रख्यात आहेत. (एकूण अकरा मारुती)–

शहापूर,मसूर, उंब्रज, माजगाव, बाहे, मनपाडळे, पारगाव, शिराळे आणि चाफळ.

## -३- समर्थ निवासाच्या प्रसिद्ध घळी

समर्थांच्या निवासाच्या पुढील घळी प्रसिद्ध आहेत–

सज्जनगड, चंद्रगिरी, शिवथरची घळ, कुबडीतीर्थ रामघळ, हेळवाक. शिवथर डोंगराच्या घळीत बसून समर्थांनी दासबोध, मनाचे श्लोक अष्टके, पदे, आरत्या वगैरे रचना केली होती.

## -४- समर्थांचे शिष्यमंडळ

राष्ट्रगुरू समर्थ रामदास स्वामींचा शिष्यपरिवार फार मोठा होता. त्यांपैकी काही विशेष शिष्यांनी धर्मप्रसार, शक्तिउपासना, अन्यायाशी झुंजून हिंदवी स्वराज्यस्थापनेच्या कार्यास साहाय्य ही कामे निष्ठापूर्वक केली. अशा अनेक

शिष्यांपैकी काही प्रसिद्ध शिष्यांची नावे –

उद्धव गोसावी, कल्याणस्वामी, आक्का, वेणूबाई, सीताबाई, भिकाजीबुवा, रंगोबा, वासुदेव, त्रिंबक, देवीदास, महादेव, मुसळराम, मौनीगोसावी, भोळाराम, आनंदभट, हनुमंत गोसावी, आप्पा, दत्तात्रय, दिवाकरभट, बाजीपंत, रोकडाराम.

## -५- समर्थांची ग्रंथरचना

समर्थांनी दासबोध नावाचा ग्रंथ लिहिला; तो मराठी भाषेचा व महाराष्ट्राचा एक अनमोल ठेवा आहे. त्या दासबोधात सुमारे दोनशे विषयांचे सुबोध वर्णन केले आहे. तो ग्रंथ वाचनीय, आदरणीय व आचरणीय आहे. या ग्रंथाच्या श्रवणाने मनुष्याची अधोगती चुकेल व बावरलेल्या मनाला खरी विश्रांती लाभेल, असे समर्थांनीच त्या ग्रंथाचे महत्त्व सांगितले आहे.

"मनाचे श्लोक" ही रचना तर फारच उद्‌बोधक आहे. त्या श्लोकांचे पाठांतर घरोघर चालत आहे. आत्माराम हा ग्रंथ, अनेक देवांच्या आरत्या, अष्टके, प्रार्थना आणि स्तोत्रे तसेच उपदेशपर अनेक काव्यरचना समर्थांनी केलेली आहे.

शिवाजीला, संभाजीला लिहिलेली अनेक पत्रे हा तर राजकाजातील मार्गदर्शनाचा आदर्श साठाच आहे!

***

BVBK-0402818